“स्वतंत्र ग्रामपंचायत नसलेल्या तांड्याचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत समाजशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

शंकर नामदेव राठोड

M.A., B.ed.

उच्च माध्यमिक आश्रमशाळा मरवाळी तांडा

ता. नायगाव जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दगडू नरसिंग दामावले

समाजशास्त्र विभागप्रमुख

पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी

ता. देवणी जि. लातूर

संशोधन केंद्र

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

जुलै : २०२२

प्रस्तावना

भारताची बहुसंख्य जनता ही खेड्यात राहत असल्यामुळे भारताला खेड्यांचा देश आणि भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कारण त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती असून कृषी हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. पूर्वीच्या काळी खेडी ही आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होती. खेड्यातील लोकांचा आर्थिक व्यवहार हा खेड्यातच चालत असे. भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था असल्याने या अर्थव्यवस्थेच्या स्थानिक प्रशासनाचे एक अविभाज्य अंग म्हणून ग्रामपंचायत ओळखली जाई. प्राचीन काळात गाव आणि ग्रामपंचायती स्थानिक दृष्टीने स्वावलंबी व स्वयंपूर्ण होत्या. आर्य कालखंडातही ग्रामपंचायती स्थानिक प्रशासनाचा अंतिम व सर्वोच्च घटक म्हणून कार्ये करीत होत्या. ग्रामीण समाजजीवनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. ग्रामपंचायतीचे अस्तित्व असल्याचा पुरावाही इतिहासात आढळतो. ग्रामपंचायती या आर्थिकदृष्ट्या भक्कम व स्वावलंबी होत्या. खेड्याचे संपूर्ण प्रशासन ग्रामपंचायतीमार्फत चालत असे.

स्थानिक शासन संस्था मानवी समाजास प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. मानवी गटाच्या स्वातंत्र्याची, प्रशासनाची गटनिहाय गरजापूर्ती स्थानिक शासनामुळेच पूर्ण होत असते. राष्ट्रीय मध्यवर्ती शासनाचा प्रतिनिधिक मध्यस्थ म्हणून स्थानिक शासनसंस्था या राष्ट्रीय उद्दिष्टे, योजना व विकास उपक्रम स्थानिक समाजात यशस्वीरित्या अंमलात आणत आहेत.

आधुनिक काळात पंचायतराज व्यवस्था ही स्थानिक संस्थाचे महत्त्वाचे अंग बनली आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारताने २६ जानेवारी १९५० पासून सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. भारताच्या राज्यघटनेतील प्रस्तावित नागरिकांच्या सर्वांगिण विकासासाठी अधिकारासाठी जी वचनबद्धता दिली आहे. ती मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे याद्वारे स्पष्ट केलेली आहे. राष्ट्रीय विकासाची जबाबदारी आणि लोकशाही कल्याणकारी राज्याचा एक भाग म्हणून देशातील जनतेच्या सर्वांगिण हितासाठी विविध प्रकारची ध्येय धोरणे शासनाकडून आखण्यात आलेली आहेत. देशातील शासनव्यवस्था

केंद्रशासन, राज्यशासन व स्थानिक स्वराज्य संस्था या तिन्ही पातळीवरील शासन यंत्रणा लोकांचे दैनंदिन व्यवहार व्यवस्थित व सुरळीत चालतील या दृष्टीने बनविल्या गेल्या आहेत. ही व्यवस्था समाजाचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी असते. या यंत्रणेत प्रामुख्याने लोकांच्या गरजा व त्यांचा सामाजिक दृष्टिकोन यांचा विचार केलेला असतो. त्यातूनच सामाजिक वातावरणाची निर्मिती होत असते.

शासनाच्या वतीने समाजातील व्यक्तींना विविध सेवा व सुविधा पुरविल्या जातात. उदा. पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, शाळा, दवाखाने, वाहतूक, करमणूकीच्या सुविधा, सरंक्षण इत्यादी सेवा व सुविधा गाव, नगर आणि शहर पातळीवर पुरविल्या जातात. गावांच्या व शहरांच्या गरजा कोणत्या आहेत हे इतरांपेक्षा त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांनाच चांगले माहीत असते. त्यातूनच स्थानिक लोकांचा कारभार सुरू होतो. या स्थानिक लोकांच्या प्रतिनिधी मंडळालाच 'स्थानिक स्वराज्य संस्था' असे म्हटले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थानिक लोकांसाठी, स्थानिक लोकांनी केलेला कारभार असतो. स्थानिक स्वराज्य संस्थाचा कारभार जेवढा चांगला तेवढा देशाचा कारभार चांगला असे म्हटले जाते.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५ प्रमाणे प्रत्येक गावात एक ग्रामपंचायत असेल. ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासाठी गावाची लोकसंख्या किमान ६०० इतकी असणे आवश्यक आहे. ज्या गावांची लोकसंख्या ६०० पेक्षा कमी आहे अशा दोन किंवा अधिक लहान गावांसाठी एकच ग्रामपंचायत असेल ग्रामपंचायतीला गट ग्रामपंचायत असे म्हणतात. शासन अध्यादेशाद्वारे महसुली गावांचा एक गट तयार करते आणि त्यास गाव म्हणून जाहीर करते. अशा गावांसाठी एकच गट ग्रामपंचायत तयार केली जाते. पुरेशी लोकसंख्या नसलेल्या गावात स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे सोयीचे नसल्यामुळे अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे. गट ग्रामपंचायतीत समाविष्ट केलेल्या गावांपैकी जे गाव लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे असेल त्याच ग्रावात गट ग्रामपंचायत स्थापन केली जाते. लोकसंख्येच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्यात बंजारा समाजाच्या तांड्याचा विचार करता ते फारच लहान असल्यामुळे तेथे स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याने तांड्याचा समावेश जवळच्या मोठ्या गावांतील गट ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आला आहे.

संशोधन समस्या

संशोधन कार्यात समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, भूर्गभ इत्यादीमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधन कार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यांमध्ये समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वात अगोदर संशोधन ससस्या निवडणे आवश्यक असते. नांदेड जिल्ह्यातील बहुतांश तांड्यामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्यामुळे त्यांचा समावेश गट ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आला आहे. वास्तविक तांड्यात ग्रामपंचायत नसल्यामुळे बहुतांश तांड्यामध्ये आजसुद्धा पिण्याचे पाणी, दिवाबती, रस्तेआणि इतर सोयी सवलतीपासून ते वंचीत राहिले आहेत. गावाच्या तुलनेत अनेक शासनाच्या कल्याणकारी योजनेपासून तांडे उपेक्षित असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळेच “स्वतंत्र ग्रामपंचायत नसलेल्या तांड्याचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा” हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

समस्या सूत्रणाचे विभिन्न अंग



१. फलोपभोगी संशोधन

समस्या निर्धारण प्रक्रियेशी संबंधित अशी एखादी व्यक्ती असते की, त्या समस्येच्या संशोधन अध्ययनाचा लाभ त्या व्यक्तीला मिळणार असतो. अशी व्यक्ती काही वेळा स्वतः अभ्यासकर्त्याच्या संपर्कात येते. त्या व्यक्तीला झालेला लाभ म्हणजे फलोपभोगी संशोधन होय.

२. फलोपभोगी संशोधनाची उद्दिष्ट्ये

समस्या सुत्रण हे कशा प्रकारे मांडले जाईल हे संशोधन ज्यांनी हाती घेतले त्या व्यक्तीला काय पाहिजे यावर अवलंबून असते. संशोधनात समस्या सुत्रण करताना त्याची उद्दिष्ट्ये फलोपयोगी होतील, याकडे लक्ष केंद्रीत केले जाते. फलोपभोगी संशोधनाची उद्दिष्टे स्पष्ट करताना समस्या सुत्रण प्रक्रियेचा त्यात अंतरभाव होतो.

३. उद्दिष्ट सिद्धीची पर्यायी साधने

एखादा विशिष्ट उद्देश साध्य करून घेण्यासाठी एकमेकांना पर्याय ठरतील, अशी एक नव्हे तर अनेक साधने असतात. संशोधन दरम्यान कोणते साधन हे उद्दिष्ट साधण्यात प्रभावी आहे हे संशोधन अध्ययनाद्वारे ठरविले जाते. अशा प्रकारे समस्येच्या स्वरूपी करणासाठी व सुत्रीकरणासाठी उद्दिष्ट सिद्धीची पर्यायी साधने असणे आवश्यक ठरते. म्हणून समस्या सुत्रण प्रक्रियेत उद्दिष्ट सिद्धीची साधने स्पष्ट करावी लागतात.

४. विशिष्ट उद्देश

विशिष्ट उद्दिष्ट अथवा विशिष्ट साध्य करण्यासाठी किमान दोन तरी मार्ग असल्याशिवाय व कोणत्या साधनाचा प्रभाव किती आहे. याबाबत काही शंका असल्याशिवाय संशोधन समस्या जन्मास येत नाही.

संशोधनाचे महत्त्व

राष्ट्र-राज्यांचे स्वरूप आता कल्याणकारी झाले आहे. त्यामुळेच देशात जबाबदार शासनपद्धती असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हे शासन व्यवस्थेचे जबाबदारीचे काम आहे. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणामुळे जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती तर ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली. तसेच गावाचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतीवर टाकण्यात आली. त्यामुळे राज्य पातळीवर विधानसभा व देश पातळीवर लोकसभा या सभागृहाएवढेच महत्त्व ग्रामपंचायतीला आले आहे. कारण कल्याणकारी व इतर महत्त्वाचे कार्य पार पाडण्याची भूमिका ग्रामपंचायत निभावत

आहे. ग्रामपंचायतीच्या अनेक कल्याणकारी निर्णयामुळे गावे समृद्ध आणि विकासाच्या प्रक्रियेमध्ये येत आहेत. परंतु नांदेड जिल्ह्यातील अनेक तांड्यामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायती नसल्यामुळे त्यांच्या विकासाला आळा बसला आहे. त्यासाठीच स्वतंत्र ग्रामपंचायत नसलेल्या ग्रामपंचायतीचा सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे

संशोधन समस्येच्या विधानाविषयी थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणे गरजेचे असते. हा नेमकेपणा संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येतो. उद्दिष्टे संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टतेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते. कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करतो. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळले पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांची पुन: पुन्हा मांडणी होते.

अभ्यासाच्या स्वरूपावरून संशोधक परिकल्पनेची मांडणी व रचना करतो. परिकल्पना या पूर्वी झालेल्या सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याच्या अनुषंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या मांडणीवरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही परिक्षणक्षम असावी, स्पटीकरणक्षम असावी आणि दोन चलांतील सहसंबंध दर्शविणारी असावी. प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती.

१. नांदेड जिल्ह्यातील विविध घटकांचा अभ्यास करणे.
२. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे अभ्यासणे.
३. नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे.

४. गट ग्रामपंचायतीतील निर्णय निर्धारण प्रक्रियेचा अभ्यास करणे.

५. गट ग्रामपंचायततंर्गत तांड्यावर राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनेचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतके

वैज्ञानिक पद्धतीने कोणत्या विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी काहीतरी पूर्वज्ञान असावे लागते. ह्या प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या विषयासंबंधी कोणतेतरी सामान्य अनुमान अथवा सिद्धांत बांधतो. हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते. संशोधक आपले लक्ष वैविध्यपूर्ण व आवश्यक तथ्यावर केंद्रीत करतो. आपल्या संशोधनाची दिशा ठरवून त्यासंबंधी पुरावे गोळा करतो व अध्ययनाच्या शेवटच्या चरणात आपले पूर्व अनुमान खरे आहे अथवा नाही ह्याचा निष्कर्ष काढतो. गृहीतकृत्ये निर्मिती हे संशोधनाचे अंतिम लक्ष नव्हे हे गृहीतकृत्ये सिद्ध करण्यासाठीच अध्ययन करावयाचे नसते. सत्य कोणते हे संशोधकाचे अंतिम लक्ष आहे. सत्य हे वास्तविक तथ्यांच्या आधारे उपलब्ध होत असते, गृहीतकृत्याच्या आधारावर नव्हे. गृहीतकृत्ये ही मुख्य विषयांवर किंवा समस्येवर लक्ष केंद्रीत करण्यास अध्ययनाची दिशा ठरविण्यास सहाय्यक ठरतात. संशोधक एका निश्चित दिशेने संशोधन करीत असतो. मग ते गृहीतकृत्ये सत्य निघेल किंवा असत्य निघेल.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे संशोधनाची गृहीतके निश्चित करण्यात आली होती.

१. नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक वैशिष्ट्ये, क्षेत्रफळ, लोकसंख्या, साक्षरता, लिंग गुणोत्तर, शैक्षणिक स्थिती, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी घटक महत्त्वपूर्ण आहेत.

२. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अर्थ, वर्गीकरण, इतिहास, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास, केंद्र व राज्यशासनाने नियुक्त केलेल्या समित्या, पंचायतराज संस्थाचे राष्ट्रीय पातळीवरून घेतलेले आढावे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे हे स्थानिक संस्थेसाठी महत्त्वपूर्ण राहिले आहेत.

३. नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांची सदस्य संख्या इत्यादीचा अभ्यास केला आहे.

४. गट ग्रामपंचायतीतील निर्णय निर्धारण प्रक्रियेवर प्रस्थापित म्हणजेच तांड्या ऐवजी गावातील व्यक्तींचा प्रभाव राहिला आहे.

५. गट ग्रामपंचायततंर्गत केंद्र व राज्य पातळीवरून राबिल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजना गाव आणि तांड्यामध्ये समतोलपणाने राबविल्या जात नाहीत.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते.

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्याहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन, स्त्रीवादांच्या समस्या यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्याचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी

कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यष्टी (Case) किंवा मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धती

तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्राथमिक तथ्य संकलन	**द्वितीय तथ्य संकलन**	
	अ.व्यक्तीगत कागदपत्रे	**ब.सार्वजनिक कागदपत्रे**
प्रत्यक्ष निरीक्षण	आत्मचरित्रे	शासकीय अहवाल/प्रकाशने
प्रश्नावली	रोजनिशी	खाजगी संस्थाचे अहवाल/प्रकाशने
मुलाखती	पत्रे	वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
अनुसूची	संस्मरण	ऐतिहासिक कागदपत्रे
विशिष्टाभ्यास		

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली व अनुसूचि तर द्वितीय स्त्रोतांमध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे, शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येईल.

नमुना निवड

समुहाच्या सर्व सदस्याची अथवा एकमेकांशी संपर्क स्थापित करून माहिती गोळा करणे या पद्धतीला जनगणना पद्धती असे म्हणतात. पण जनगणना पद्धत समूह लहान असेल तर शक्य असते. दुसऱ्या पद्धतीत समुहाचे प्रतिनिधित्व सदस्य म्हणून माहिती देतो. त्या पद्धतीला नमुना निवड असे म्हणतात.

नमुना निवडीच्या व्याख्या

१. गुडे आणि टरे

यांच्या मते, ''नमुना त्यातील नावाप्रमाणे विस्तृत समुहाचा लोक प्रतिनिधी असतो.''

२. यंग

यांच्या मते, ''एक सांख्यिकीय नमुना समुहाच्या किंवा समग्रातून निवडला जातो त्याला नमुना निवड असे म्हणतात.''

३. प्रा.डॉ.डी.डी.भक्कड

यांच्या मते, ''संशोधनात समग्राबाबत काही अनुमान बांधण्याकरता समग्रामधून पाहणीसाठी एक भाग निवडला जातो, त्यास नमुना निवड असे म्हणतात.''

नमुना निवडीच्या पायऱ्या

संशोधकाने नमुना निवडताना कोणत्या पायऱ्याचा अवलंब केला पाहिजे या संदर्भातील पायऱ्यांचा पुढीलप्रमाणे आढावा घेण्यात आला आहे.

१. समग्राचे निश्चितीकरण

नमुना निवडताना सर्व प्रथम समग्र तथा अभ्यास विषय निश्चित करावा लागतो. या अभ्यास विषयातून घटकांची निवड कशी करावी हे ठरवावे लागते. लोकसंख्या भौगोलिक प्रवेश वगैरे बाबीचा विचार करूनच नमुना निवड करावी लागते.

२. घटकांची निश्चिती

समग्र तथा विषय निश्चित झाल्यानंतर नमुना निवडीत कोणत्या घटकांचा समावेश असावा, हे ठरवावे लागते. विषयातील काही घटक समान तर काही विरूद्ध स्वरुपाचे असतात. त्याचा

विचार करून त्यांचे निश्चित स्वरूप ठरवावे लागते. यात भौगोलिक घटक, निवास, सामाजिक समूह आणि व्यक्ती यांचा समावेश होतो.

३. उगम सूची

नमुना निवड करताना उगम सूचीचा विचार करावा लागतो. सूची ही संपूर्ण स्वरूपात असणे हे जेवढे आवश्यक असते तेवढेच ती अध्यावत असणे महत्त्वाचे असते.

४. नमुना आकार

नमुन्याचा आकार विषयाला अनुरूप असावा. तो फार मोठा असू नये किंवा फार लहान असू नये म्हणजे नमुन्याचा आकार मध्यम असावा.

५. समग्रातील निश्चितीकरण

कोणत्या घटकांकडून कशी माहिती मिळते याची कल्पना संशोधकाला असावी. तरच नमुना निवड नक्की करताना अभ्यास विषयाचे स्वरूप लक्षात घेऊन विविध घटकाकडून माहिती मिळविण्यासाठी पैसा वेळ व श्रम खर्च यात बचत होते. त्यासाठी नमूना पद्धतीने समग्राचे निश्चितीकरण करून घ्यावे लागते.

नमुना निवड पद्धतीचे आधार

संशोधनाचा एक अविभाज्य घटक म्हणून नमुना चाचणीचा उल्लेख केला जातो. म्हणूनच नमुना चाचण्यांचे तंत्र समजून घेण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जातो. या तंत्राची महत्त्वाची बाब म्हणजे नमुना निवडायचा कसा? या प्रश्नाचे उत्तर शोधने होय. म्हणून नमुना चाचणीचे आधार कोणते हे माहित करून घेणे महत्त्वाचे आहे.



१. सजातीयता

अनेक घटकांचे प्रतिनिधीत्व करू शकणारे काही घटक निवडून त्याचा सखोल अभ्यास नमुना चाचणीत केला जाते. त्यामुळे अभ्यासासाठी निवडलेले घटक व इतर असंख्य यांच्यामध्ये काही समान वैशिष्ट्ये असली पाहिजे. एका विशिष्ट गृहाचे गुणधर्म गटातील काही घटकांची निवड करताना त्या घटकांजवळ असतील तर त्यांची निवड सार्थक ठरेल.

२. प्रतिनिधीत्वता

प्रतिनिधीत्वता हा नमुना निवडीचा प्रमुख आधार आहे. ज्या समुहाचा सखोल अभ्यास करावयाचा आहे. त्या समुहातील काही नमुना घटक निवडावे लागतात. त्यातील एकाला प्रतिनिधीत्व दिले जाते. काही प्रभेदक वैशिष्ट्ये नमुना घटकात व प्रतिनिधीकडे असलीच पाहिजे.

३. पर्याप्तता

नमुना निवड करताना विशिष्ट समूह गटाचे प्रतिनिधीत्व निवडलेले घटक करीत आहे की नाही हे पाहणे महत्त्वाचे असते. घटकांपैकी काही घटकांची निवड करताना त्यामध्ये १०० टक्के

अचूकपणा असेल यांची खात्री संशोधकाला करावी लागते. नैसर्गिक विज्ञानात हा अचूकपणा गृहीत धरावा लागतो. तर व्यवस्थापन संशोधनात सरासरीवरच अवलंबून राहावे लागते.

नमुना निवडीचे प्रकार

नमुना निवडीच्या प्रामुख्याने संभाव्यता आणि गैर संभाव्यता अशा दोन पद्धती आहेत. यांची पुढीलप्रमाणे मांडणी केली आहे.

नमुना निवडीच्या पद्धती

संभाव्यता नमुना निवड

↓ सरळ यादृच्छिक नमुना

↓ व्यवस्थाबद्ध नमुना

↓ स्तरीय नमुना

↓ एकक पुंज नमुना

↓ क्षेत्र नमुना

↓ बहुस्तरीय नमुना

↓ अनुपातित नमुना

↓ नियमित अंकण नमुना

गैर संभाव्यता नमुना निवड

↓ सोयीस्कर नमुना

↓ कोटा नमुना

↓ स्नोबॉल नमुना

↓ स्वनिर्णीत नमुना

वरील प्रमाणे नैसर्गिक व सामाजिक संशोधनामध्ये संभाव्यता व गैर संभाव्यता या नमुना निवड पद्धतीचा उपयोग होत असतो. संभाव्यता ही नमुना निवड पद्धत ही मूर्त किंवा वैज्ञानिक पद्धतीशी संबंधीत आहे. तर गैर संभाव्यता नमुना निवड पद्धत ही अमूर्त किंवा सामाजिक शास्त्राशी संबंधित आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्हा संशोधन क्षेत्र निश्चित केले आहे. उत्तर दात्यांची निवड करताना यादृच्छीक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने नांदेड जिल्ह्यातील गट ग्रामपंचायतीतील १०० सरपंच, २०० ग्रामपंचायत सदस्य आणि ३४० सामान्य नागरिक असे एकूण ६४० उत्तरदात्यांची संख्या निश्चित केली आहे. तर प्रत्येक तालुकानिहाय ४० उत्तरदाते निवडले आहेत. या निवडलेल्या उत्तरदात्यांमधून प्रश्नावली व अनुसूचीच्या माध्यमातून माहिती संकलीत केली आहे. तसेच प्राथमिक साधन सामुग्रीचा अभ्यास करीत असताना वेगवेगळ्या सांखिकीय साधनांचा उपयोग करण्यात आला.

संशोधनाची मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र नांदेड जिल्हा असून ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर ही संदर्भ येऊ शकतात.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : नांदेड जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण तिसरे : स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास

प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था

प्रकरण पाचवे : प्रस्तुत माहितीचे अर्थनिर्वचन

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ

१. लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली द्वारे प्रकाशित, संविधान सभा आणि डिबेट्स, अुवादक देविदास घोडेस्वार, प्रथम संस्करण, २०१३

२. तुकाराम जाधव, भारतीय संविधानाची घटनात्मक प्रक्रिया, प्रकाशन, युनिक अकॅडमी पुणे

३. बि.एल.फडिया, राजनितिक सिद्धांत, प्रतियोगीता साहित्य सिरीज, आगरा

४. व्ही.बी.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२

५. ए.एन.भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२

६. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती

७. पी.एल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथमावृत्ती १९९४

८. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

९. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

१०. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन,

११. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher. २००६

१२. www.wikipedia.org

संशोधक विद्यार्थी

शंकर नामदेव राठोड
M.A., B.ed.
उच्च माध्यमिक आश्रमशाळा
मरवाळी तांडा
ता. नायगाव जि. नांदेड

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ. दगडू नरसिंग दामावले
समाजशास्त्र विभागप्रमुख
पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी
ता. देवणी जि. लातूर